# मेट्रो-३ च्या २२ स्थानकांचे 'ब्रँडिग'

## रेल्वे प्रशासनाला मिळणार महसूल; ५ वर्षांसाठी करार, निविदा प्रक्रिया सुरू

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मूळ मेट्रो स्थानकांच्या नावांचे ब्रँडिग करण्याच्या दृष्टीने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्या अंतर्गत कुलाबा -वांद्रे -सिप्झ मेट्रो ३ च्या २२ स्थानकांचे ब्रँडिग करण्यासाठी कार्यवाही सुरू झाली आहे. पाच स्थानकांच्या ब्रँडिगचे हक्क यापूर्वीच काही कंपन्यांना देण्यात आले आहे. ब्रँडिगच्या माध्यमातून मेट्रोला महसूल मिळणार आहे.



स्थानकांचे ब्रँडिग म्हणजे कोणतीही खासगी कंपनी किंवा आस्थापनेचे नाव स्थानकाच्या मूळ नावांसोबत जोडले जाते. मूळ स्थानकाला कंपनीचे नाव जोडले गेल्याने कंपनीच्या नावासह स्थानकाचा उल्लेख होतो. फलाटावर, तिकिटावर, उद्घोषणा करताना सलग उल्लेख केला जातो. त्या माध्यमातून संबंधित कंपनीची जाहिरात तर होतेच, शिवाय मेट्रोला महसुलही मिळतो. मेट्रो ३ मार्गावर २७ स्थानके असून त्यापैकी २६ स्थानके भूमिगत आहेत, तर एकमेव आरे स्थानक जमिनीच्या पृष्ठभागावर आहे.

पाच स्थानकांचे ब्रँडिग यापूर्वीच झाले आहे. कोटक महिंद्रा, एलआयसी आणि आयसीआयसीआय या कंपन्यांना ब्रँडिगचे हक्क मिळाले आहेत. त्यामुळे मेट्रोची पाच स्थानके एलआयसी चर्चगेट, एलआयसी हुतात्मा चौक, कोटक महिंद्रा सीएसएमटी, आयसीआयसीआय सिद्धीविनायक आणि कोटक महिंद्रा बीकेसी या नावाने ओळखली जातील. याच धर्तीवर उर्वरित २२ स्थानकांचे ब्रँडिंग होणार आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

१७ जुलै नंतर ब्रँडिग प्रक्रिया पूर्ण होईल. ब्रँडिगचा करार पाच वर्षांसाठी असेल. स्थानकांचे अशा प्रकारे ब्रँडिग करण्याचा उपक्रम सर्वात आधी घाटकोपर - वर्सोवा मेट्रो मार्गावर राबवण्यात आला आहे. सर्वच मेट्रो मार्गांचा दैनंदिन खर्च आणि महसूल यात कायमच तफावत राहणार आहे.

### ● खर्च भरून काढण्याचा प्रयत्न

महसुलापेक्षा खर्च जास्त असणार आहे. त्यामुळे खर्च भरून काढणे, तोटा होऊ न देणे, मेट्रो चालवण्यासाठी अधिकाधिक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी एमएमआरडीए आणि मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने आतापासूनच प्रयत्न सुरू केले आहेत. त्यासाठीच स्थानकावरील जागा भाड्याने देणे, जाहिरातीचे हक्क देणे, मेट्रो स्थानक परिसराचा विकास करणे आदी माध्यमातून महसूल मिळवण्यावर भर दिला जात आहे.